**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून खालील संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी विहित अर्हता धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांकडून स्पर्धात्मक परीक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा म्हाडाच्या www.mhada.gov.in या संकेतस्थळावर दि.१७.०९.२०२१ ते दि. १४.१०.२०२१ पर्यंत उपलब्ध राहील.**

| **अ.क्र** | **भरती प्रक्रिया कार्यक्रम** | |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन भरण्याचा कालावधी | दि. १७.०९.२०२१ सकाळी ११.०० ते दि. १४.१०.२०२१ रात्री २३.५९ पर्यंत |
| २ | ऑनलाईन परीक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी | दि. १७.०९.२०२१ ते दि. १५.१०.२०२१ रात्री २३.५९ पर्यंत |
| ३ | ऑफ़लाईन परीक्षेचा अंदाजित दिनांक | नोव्हेंबर २०२१ |

भरती प्रक्रिये संदर्भातील सर्व कार्यक्रम व सूचना म्हाडाच्या वरील संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. भरती प्रक्रिये संदर्भातील निर्णयाचे सर्व अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील.

**१) भरावयाच्या पदांचा तपशिल :**

| अ. क्र | संवर्गाचे नांव व वेतन संरचना | गट | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | | | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | अनाथ आरक्षण १% | समांतर आरक्षण विरहित | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) वेतनश्रेणी - स्तर - एस २३ ६७७००-२०८७०० | अ | अनु.जाती | - | | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | विजा (अ) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | इमाव | - | - | - | १ | - | - | - | २ | **३** |
| | | | ईडब्ल्यूएस | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | अराखीव | - | - | - | २ | - | - | - | ५ | **७** |
| | | | **एकूण** | **-** | **-** | **-** | **३** | **-** | **-** | **-** | **१०** | **१३** |
| २ | उप अभियंता (स्थापत्य) वेतनश्रेणी स्तर - एस २० ५६१००-१७७५०० | अ | अनु.जमाती | - | - | - | १ | - | - | - | १ | **२** |
| | | | भ.ज.(क) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | इमाव | - | - | - | १ | - | - | - | १ | **२** |
| | | | ईडब्ल्यूएस | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | अराखीव | - | - | - | २ | - | - | - | ५ | **७** |
| | | | **एकूण** | **-** | **-** | **-** | **४** | **-** | **-** | **-** | **९** | **१३** |
| ३ | मिळकत व्यवस्थापक / प्रशासकीय अधिकारी वेतनश्रेणी स्तर - एस २० ५६१००-१७७५०० | ब | अनु.जाती | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | अराखीव | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | **एकूण** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **२** | **२** |
| ४ | सहायक अभियंता (स्थापत्य) वेतनश्रेणी - स्तर - एस १५ ४१८००-१३२३०० | ब | अनु.जाती | - | - | - | २ | - | - | - | ४ | **६** |
| | | | अनु.जमाती | - | - | - | १ | - | - | - | ३ | **४** |
| | | | विजा (अ) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | इमाव | - | - | - | १ | - | | - | ३ | **४** |
| | | | ईडब्ल्यूएस | - | - | - | १ | - | - | - | २ | **३** |
| | | | अराखीव | - | - | - | ४ | १ | - | - | ७ | **१२** |
| | | | **एकूण** | | | **-** | **९** | **१** | **-** | **-** | **२०** | **३०** |

| अ. क्र | संवर्गाचे नांव व वेतन संरचना | गट | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | | | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | अनाथ आरक्षण १% | समांतर आरक्षण विरहित | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| ५ | सहायक विधी सल्लागार वेतनश्रेणी स्तर - एस १५ ४१८००-१३२३०० | ब | अनु.जाती | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | अराखीव | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | **एकूण** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **२** | **२** |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वेतनश्रेणी - स्तर - एस १४ ३८६००-१२२८०० | क | अनु.जाती | २ | १ | - | ३ | १ | १ | - | ३ | **११** |
| | | | अनु.जमाती | २ | १ | - | ३ | १ | १ | - | २ | **१०** |
| | | | विजा (अ) | - | - | - | १ | - | - | - | २ | **३** |
| | | | भ.ज.(ब) | - | - | - | १ | - | - | - | २ | **३** |
| | | | भ.ज.(क) | - | - | - | १ | - | - | - | १ | **२** |
| | | | भ.ज.(ड) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | विमाप्र | १ | - | - | १ | - | - | - | २ | **४** |
| | | | इमाव | ३ | १ | - | ५ | १ | २ | - | ५ | **१७** |
| | | | ईडब्ल्यूएस | २ | १ | - | ४ | १ | १ | - | ३ | **१२** |
| | | | अराखीव | ८ | ३ | १ | १७ | ३ | ६ | १ | १७ | **५६** |
| | | | **एकूण** | **१८** | **७** | **१** | **३६** | **७** | **११** | **१** | **३८** | **११९** |
| ७ | कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ सहायक वेतनश्रेणी - स्तर - एस १५ ४१८००-१३२३०० | क | अनु.जाती | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | अनु.जमाती | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | इमाव | - | - | - | १ | - | - | - | १ | **२** |
| | | | ईडब्ल्यूएस | - | - | - | - | | - | - | १ | **१** |
| | | | अराखीव | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | **एकूण** | **-** | **-** | **-** | **१** | | **-** | **-** | **५** | **६** |
| ८ | स्थापत्य अभियांत्रीकी सहायक वेतनश्रेणी - स्तर - एस ८ २५५००-८११०० | क | अनु.जाती | १ | - | - | २ | - | १ | - | १ | **५** |
| | | | अनु.जमाती | - | - | - | १ | - | - | - | १ | **२** |
| | | | विजा (अ) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | भ.ज.(क) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | भ.ज.(ड) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | विमाप्र | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | इमाव | १ | - | - | ३ | - | १ | - | ४ | **९** |
| | | | ईडब्ल्यूएस | १ | - | - | १ | - | - | - | २ | **४** |
| | | | अराखीव | ३ | १ | - | ६ | १ | २ | - | ७ | **२०** |
| | | | **एकूण** | **६** | **१** | **-** | **१३** | **१** | ४ | **-** | **१९** | ४४ |
| ९ | सहायक वेतनश्रेणी - स्तर - एस १४ ३८६००-१२२८०० | | अनु.जाती | - | - | - | १ | - | - | - | २ | **३** |
| | | | विजा (अ) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | इमाव | १ | - | - | १ | - | - | - | २ | **४** |
| | | | ईडब्ल्यूएस | - | - | - | १ | - | - | - | १ | **२** |
| | | | अराखीव | १ | - | - | २ | - | १ | - | ४ | **८** |
| | | | **एकूण** | **२** | - | - | **५** | | **१** | - | **१०** | **१८** |

| अ. क्र | संवर्गाचे नांव व वेतन संरचना | गट | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | | | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | अनाथ आरक्षण १% | समांतर आरक्षण विरहित | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १० | वरीष्ठ लिपीक वेतनश्रेणी - स्तर - एस १० २९२००-९२३०० | क | अनु.जाती | २ | १ | - | ३ | १ | १ | - | २ | **१०** |
| | | | अनु.जमाती | १ | - | - | १ | - | - | - | २ | **४** |
| | | | विजा (अ) | - | - | - | १ | - | - | - | १ | **२** |
| | | | भ.ज.(ब) | - | - | - | १ | - | - | - | १ | **२** |
| | | | भ.ज.(क) | - | - | - | १ | - | - | - | २ | **३** |
| | | | भ.ज.(ड) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | विमाप्र | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | इमाव | २ | १ | - | ४ | १ | १ | - | ५ | **१४** |
| | | | ईडब्ल्यूएस | १ | - | - | २ | - | १ | - | ३ | **७** |
| | | | अराखीव | ४ | १ | १ | ९ | १ | ३ | - | १० | **२९** |
| | | | **एकूण** | **१०** | **३** | **१** | **२२** | **३** | **६** | **-** | **२८** | **७३** |
| ११ | कनिष्ठ लिपीक - टंकलेखक वेतनश्रेणी - स्तर - एस ६ १९९००-६३२०० | क | अनु.जाती | ४ | १ | १ | ८ | १ | ३ | - | १० | **२८** |
| | | | अनु.जमाती | २ | १ | - | ४ | १ | १ | - | ४ | **१३** |
| | | | विजा (अ) | १ | - | - | १ | - | - | - | २ | **४** |
| | | | भ.ज.(ब) | - | - | - | १ | - | - | - | २ | **३** |
| | | | भ.ज.(क) | १ | - | - | २ | - | १ | - | ३ | **७** |
| | | | भ,ज,(ड) | १ | - | - | १ | - | - | - | २ | **४** |
| | | | विमाप्र | १ | - | - | २ | - | १ | - | १ | **५** |
| | | | इमाव | ७ | २ | १ | १३ | २ | ४ | - | १५ | **४४** |
| | | | ईडब्ल्यूएस | ३ | १ | - | ६ | १ | २ | - | ८ | **२१** |
| | | | अराखीव | १२ | ४ | २ | २३ | ४ | ८ | १ | २४ | **७८** |
| | | | **एकूण** | **३२** | **९** | **४** | **६१** | **९** | **२०** | **१** | **७१** | **२०७** |
| १२ | लघुटंकलेखक वेतनश्रेणी - स्तर - एस ८ २५५००-८११०० | क | अनु.जाती | - | - | - | १ | - | - | - | २ | **३** |
| | | | अनु.जमाती | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | विजा (अ) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | भ.ज.(ब) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | भ.ज.(क) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | इमाव | १ | - | - | १ | - | - | - | २ | **४** |
| | | | ईडब्ल्यूएस | - | - | - | १ | - | - | - | १ | **२** |
| | | | अराखीव | १ | - | - | २ | - | १ | - | ३ | **७** |
| | | | **एकूण** | **२** | **-** | **-** | **५** | **-** | **१** | **-** | **१२** | **२०** |
| १३ | भुमापक वेतनश्रेणी स्तर - एस ६ १९९००-६३२०० | क | अनु.जाती | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | अनु.जमाती | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | विजा (अ) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | भ.ज.(ब) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | इमाव | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | ईडब्ल्यूएस | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | अराखीव | १ | - | - | २ | - | १ | - | १ | **५** |
| | | | **एकूण** | **१** | **-** | **-** | **२** | **-** | **१** | **-** | **७** | **११** |

| अ. क्र | संवर्गाचे नांव व वेतन संरचना | गट | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | | | | | | | | एकूण पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | महिला ३०% | खेळाडू ५% | अंशकालीन १०% | अनाथ आरक्षण १% | समांतर आरक्षण विरहित | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १४ | अनुरेखक वेतनश्रेणी स्तर - एस७ २१७००-६९१०० | क | अनु.जाती | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | अनु.जमाती | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | विजा (अ) | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | इमाव | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | ईडब्ल्यूएस | - | - | - | - | - | - | - | १ | **१** |
| | | | अराखीव | - | - | - | १ | - | - | - | १ | **२** |
| | | | **एकूण** | **-** | **-** | **-** | **१** | **-** | **-** | **-** | **६** | **७** |

- **कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अ.जा.प्रवर्गातील एक पद हे मा. उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल असलेल्या रिट पिटीशन क्र. ३४२८६/१५ प्रकरणाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.**

**टिप: १) वर नमूद पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल /वाढ होऊ शकते.**

**२) वरीलमध्ये 'ई.डब्ल्यू.एस' म्हणजे 'आर्थिकदृष्टया दुर्बल घटक' होय.**

**३)दिव्यांगासाठी आरक्षित पदे :** शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दि. २९.०५.२०१९ नुसार गट 'क' संवर्गातील एकूण रिक्त पदांपैकी २० पदे दिव्यांगाकरीता आरक्षित राहतील. सदर पदांपैकी अ) अंध /अल्पदृष्टी ५ पदे, ब) कर्णबधिरता अथवा ऐकू येण्याची दुर्बलता ५ पदे, क) अस्थिव्यंगता /मेंदूचा पक्षघात (Cerebral palsy)/कुष्ठरोग मुक्त (Leprosy cured)/ शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism)/आम्लहल्लाग्रस्त (acid attack victims)/स्नायू विकृती (Muscular dystrophy ) ५ पदे व ड) स्वमग्नता (Autism)/मंदबुध्दी किंवा आकलनक्षमतेची कमतरता (Intellectual Disability) /विशिष्ट शिक्षण अक्षमता(specific learning disability)/मानसिक आजार (Mental illness) व अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणा-यांसाठी ५ पदे.

तसेच गट 'अ' मध्ये कार्यकारी अभियंता व उपअभियंता संवर्गातील प्रत्येकी १ पद व गट 'ब' मध्ये सहायक अभियंता संवर्गातील १ पद दिव्यांगाकरीता आरक्षित राहील.

## २. वयोमर्यादा व विहित शैक्षणिक अर्हता :

उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास (दि. १४/१०/२०२१) रोजी धारण केलेली असावी.

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | गट | अर्हता /अनुभव | किमान व कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | अ | १)महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील स्थापत्य अथवा बांधकाम शाखेतील पदवी धारण केलेली असावी .<br>२)वरील अर्हता धारण केल्यानंतर शासकीय /निमशासकीय /मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी /फर्म कार्यालयातील ७ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा क्षेत्रीय कामाचा अनुभव असावा. | १८ ते ४० |
| २ | उप अभियंता (स्थापत्य) | अ | १) महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील स्थापत्य अथवा बांधकाम शाखेतील पदवी धारण केलेली असावी.<br>२)वरील अर्हता धारण केल्यानंतर शासकीय /निमशासकीय /मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी /फर्म कार्यालयातील ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा क्षेत्रीय कामाचा अनुभव असावा. | १८ ते ३८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | मिळकत व्यवस्थापक / प्रशासकीय अधिकारी | ब | १)महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील पदवी धारण केलेली असावी.<br>आणि<br>२) व्यवसाय व्यवस्थापन (Business Management) मधील वाणिज्य व वित्त मधील (Marketing and Finance) पदवी /पदविका धारण केलेली असावी.<br>३)वरील शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर शासकीय /निमशासकीय /मंडळे/महामंडळे/सरकारी उपक्रमे अथवा नोंदणीकृत सुप्रस्थापित कंपनी /फर्म कार्यालयात वाणिज्य व वित्त क्षेत्राचा प्रशासकीय कामाचा ५ वर्षाचा अनुभव असावा. | १९ ते ३८ |
| ४ | सहायक अभियंता (श्रेणी -२) | ब | १)महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील स्थापत्य शाखेतील पदवी धारण केलेली असावी.<br>किंवा<br>शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता धारण केलेली असावी. | १८ ते ३८ |
| ५ | सहायक विधी सल्लागार | अ | १)महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील कायदयाची पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी.<br>२) वरील शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर उच्च न्यायालय अथवा राज्यातील कनिष्ठ न्यायालयातील वकिलीचा विशेषत: भूधारणा (Land Tenures), मालमत्तेचे हस्तांतरण, घरबांधणी , मालकी हक्काचे प्लॅटस, सहकारी गृहनिर्माण संस्था आणि इतर प्राधिकरणाशी संबधित असलेल्या कामांचा पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव असावा. | १८ ते ३८ |
| ६ | कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ सहायक | क | १) ज्याने वास्तुविशारद या विषयातील पदवी /पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी.<br>२) ज्यांची Council of Architecture (COA)मध्ये नोंदणी झालेली असेल. | १९ ते ३८ |
| ७ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | क | महाराष्ट्र शासन मान्य विद्यापीठातील स्थापत्य शाखेतील पदविका धारण केलेली असावी.<br>किंवा<br>शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता धारण केलेली असावी. | १८ ते ३८ |
| ८ | सहाय्यक | क | १) महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवी धारण केलेली असावी.<br>२) प्रशासकीय कामाचा ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा अनुभव असावा. | १९ ते ३८ |
| ९ | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | क | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून देण्यात आलेले स्थापत्य अभियांत्रिकी मधील प्रमाणपत्र किंवा त्यांच्याशी समतुल्य अर्हता धारण केलेली असावी. | १८ ते ३८ |
| १० | वरिष्ठ लिपिक | क | १) महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवी धारण केलेली असावी.<br>२) प्रशासकीय कामाचा ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा अनुभव असावा. | १९ ते ३८ |
| ११ | कनिष्ठ लिपिक-टंकलेखक | क | १) महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवी धारण केलेली असावी.<br>आणि<br>२) मराठी टंकलेखनाचे किमान ३०श.प्र.मि. वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० श.प्र.मि. वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. | १९ ते ३८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | लघुटंकलेखक | क | १)माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>२) शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र ही लघुलेखनाची परीक्षा ८० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाची परीक्षा ४०श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखनाची परीक्षा ३० श.प्र.मि. उत्तीर्ण असावी. | १९ ते ३८ |
| १३ | भूमापक | क | १)माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>२) वरील शैक्षणिक अर्हता धारण केल्यावर शासकीय किंवा शासन मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून देण्यात आलेले भू -मापक (Surveyor) या विषयाचे दोन वर्षाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. | १८ ते ३८ |
| १४ | अनुरेखक | क | १)माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा शासनाने त्या परीक्षेशी समतुल्य म्हणून जाहीर केलेली कोणतीही इतर परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>२)मध्यम श्रेणी चित्रकला परीक्षा (Intermediate Grade Drawing Examination) किंवा मान्यताप्राप्त स्थापत्य आरेखक अभ्यासक्रम परीक्षा किंवा तिच्याशी समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेली असावी.<br>किंवा<br>३) वास्तुशास्त्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रमाणपत्र धारण केलेले असावे. | १८ ते ३८ |

| **अ.क्र.** | **खालील उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादेत शिथीलता राहील** | **कमाल वयोमर्यादा** |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय प्रवर्गात मोडणारे उमेदवार यांचेसाठी | कमाल वयोमर्यादेच्या ५ वर्ष अधिक |
| २ | प्रकल्पग्रस्त यांचेसाठी | ४५ वर्षापर्यंत |
| ३ | दिव्यांग असणा-या (Person with Disability) उमेदवार यांचेसाठी | ४५ वर्षापर्यंत |
| ४ | अ) माजी सैनिक यांचेसाठी | विहित वयोमर्यादेतील सूट सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी<br>अधिक ३ वर्ष इतका राहील |
| ५ | ब) दिव्यांग असणा-या (Person with Disability) माजी सैनिक यांचेसाठी | ४५ वर्षापर्यंत |
| ६ | अंशकालीन उमेदवार यांचेसाठी | ५५ वर्षापर्यंत |
| ७ | खेळाडू उमेदवार यांचेसाठी | ५ वर्ष पर्यंतची अट शिथील.<br>जास्तीत जास्त ४३ वर्षे |
| ८ | भूकंपग्रस्त उमेदवार यांचेसाठी | ४५ वर्षापर्यंत |
| ९ | स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य, १९९१ चे जनगणना कर्मचारी व १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी उमेदवार यांचेसाठी | ४५ वर्षापर्यंत |
| १० | म्हाडाच्या सेवेतील कर्मचारी | कमाल वयोमर्यादेची अट लागू नाही |

**परीक्षेचे स्वरुप :-**

१) खालील पदांसाठी उमेदवारांची निवड करतांना २०० गुणांची ऑफ लाईन परीक्षा पदनिहाय घेण्यात येणार असून सदर परीक्षेकरीता खालीलप्रमाणे विषय असतील.

| अ.क्र. | पदनाम | परीक्षेचे स्वरुप व गुण (विषय) | परीक्षेचा दर्जा |
|---|---|---|---|
| १ | i) कार्यकारी अभियंता (स्थापत्य)<br>ii) उपअभियंता (स्थापत्य)<br>iii) सहाय्यक अभियंता (स्थापत्य) | मराठी भाषा, इंग्रजी भाषा, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी प्रत्येकी २५ गुण याप्रमाणे १०० गुण आणि संबधित शाखेतील तांत्रिक विषय १०० गुण याप्रमाणे. | शासन मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान परंतु मराठी या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२वी) च्या दर्जाच्या समान |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | मराठी भाषा, इंग्रजी भाषा, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी प्रत्येकी २५ गुण याप्रमाणे १०० गुण आणि संबधित शाखेतील तांत्रिक विषय १०० गुण याप्रमाणे. | शासन मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदविका परीक्षेच्या दर्जाच्या समान परंतु मराठी या प्रश्नपत्रिकेचा दर्जा माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १०वी) च्या दर्जाच्या समान |
| ३ | मिळकत व्यवस्थापक/ प्रशासकीय अधिकारी | मराठी , इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी प्रत्येकी २५ गुण याप्रमाणे १०० गुण आणि व्यवसाय व्यवस्थापन संबंधित शाखेतील १०० गुण. | शासन मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या तसेच व्यवसाय व्यवस्थापन (Business Management) मधील वाणिज्य व वित्त (Marketing and Finance) दर्जाच्या समान. परंतु मराठी या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२वी) च्या दर्जाच्या समान. |
| ४ | i) सहायक<br>ii) वरीष्ठ लिपीक<br>iii) कनिष्ठ लिपीक-टंकलेखक | मराठी , इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी प्रत्येकी ५० गुण याप्रमाणे एकूण २०० गुण | शासन मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान परंतु मराठी या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२वी) च्या दर्जाच्या समान. |
| ५ | कनिष्ठ वास्तुशात्रज्ञ सहायक | मराठी भाषा, इंग्रजी भाषा, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी प्रत्येकी २५ गुण याप्रमाणे १०० गुण आणि संबधित शाखेतील तांत्रिक विषय १०० गुण याप्रमाणे. | शासन मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदविका परीक्षेच्या दर्जाच्या समान परंतु मराठी या प्रश्नपत्रिकेचा दर्जा माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १०वी) च्या दर्जाच्या समान |
| ६ | i) स्थापत्य अभियांत्रिकी सहायक<br>ii) भुमापक<br>iii) अनुरेखक<br>iv) लघुटंकलेखक | मराठी , इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी प्रत्येकी ५० गुण याप्रमाणे एकूण २०० गुण. (लघुटंकलेखक या संवर्गात गुणवत्ता यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांची ५० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. एकूण २५० गुण ) | माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १० वी) च्या परीक्षेच्या दर्जा समान, |
| ७ | सहायक विधी सल्लागार | मराठी भाषा, इंग्रजी भाषा, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी प्रत्येकी २५ गुण याप्रमाणे १०० गुण आणि विधी शाखेतील विषय १०० गुण याप्रमाणे. | शासन मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या विधी पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान परंतु मराठी या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२वी) च्या दर्जाच्या समान. |

**४. परीक्षा शुल्क**

| | |
|---|---|
| अमागास प्रवर्ग | रु. ५००/- |
| मागास प्रवर्ग | रु. ३००/- |

टिप :अ) वर दर्शविण्यात आलेले परीक्षा शुल्क हे बँक प्रोसेसिंग शुल्क (लागू असेल तर )वगळून आहे. तसेच परीक्षा शुल्काची रक्कम ही ना परतावा असेल.

ब) उमेदवाराला एकापेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरावे लागेल.

क) माजी सैनिकांना परीक्षा शुल्क लागू नाही.

**५.निवडीचे निकष :**

गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने ऑफलाइन/लेखी परीक्षेत एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. तसेच सदर निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निकष शिथील करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

पदासाठी विहित केलेल्या अर्हता /अटी / शर्ती पूर्ण करणा-या पात्र उमेदवारांची सदर परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे बनविलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांकडून विहित आरक्षणानुसार निवड यादी बनविण्यात येईल.

एकाच पदासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास दि. ०२.१२.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल :-.

१) समान गुण असल्यास आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

२) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतक-याचा पाल्य नसेल अथवा वरील अ.क्र. १ नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त असतील तर त्यापैकी वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

३) वरील अनु.क्र. १ व २ या दोन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे ) धारण करणा-या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

४) वरील अनु.क्र. १, २ व ३ या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतम गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**६. वरील पदांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांकरीता सूचना :**

१) उपरोक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज www.mhada.gov.in संकेतस्थळावर दि. १७.०९.२०२१ पासून ते दि.१४.१०.२०२१ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

२) विहीत पध्दतीने माहिती सादर करुन शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरण्याची कार्यवाही दि.१५.१०.२०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

३) स्पर्धात्मक परीक्षा स्थगित व रद्द करणे, परीक्षेचे स्वरुप, तारीख व ठिकाणात बदल करणे, पदसंख्या, अनुशेष व आरक्षण यात वाढ किंवा घट करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. वर दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार प्राप्त न झाल्यास सामाजिक आरक्षणाच्या त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

४) ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव **रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय /समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड /अपंग कल्याण कार्यालय इ.** कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांना देखिल परीक्षेसाठी स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणा-या उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे अर्ज ऑनलाईनच सादर करणे आवश्यक आहे.

५) एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घेतली गेल्यास वेगवेगळया सत्रांमधील वापरलेल्या टेस्ट बॅटरीजच्या काठिण्यपातळीत थोडासा फरक असल्यामुळे हा फरक जुळवून घेण्यासाठी मिळालेले गुण समिकृत केले जातील.

६) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथीलीकरण इत्यादी पात्रता तपासूनच उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावा.

७) उमेदवारांची परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी /छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑफलाईन /लेखी परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड

प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण राखून ठेवीत आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

८) परीक्षेच्या वेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परीसरात मोबाईल, गणकयंत्र (कॅल्क्युलेटर), आयपॅड तत्सम इलेक्ट्रॉनिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधने वापरण्यास सक्त मनाई आहे.

९) इतर राज्यातून महाराष्ट्रात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्ग उमेदवारांचा आरक्षित पदांकरीता विचार केला जाणार नाही.

१०) उमेदवारास परीक्षा /कागदपत्र पडताळणी इत्यादी करीता स्वखर्चाने यावे लागेल.

११) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची यादी परीक्षेकरीता संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल.

१२) उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी अडचणी आल्यास दूरध्वनी क्रमांक ०२२-६६४०५४५७ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. तसेच recruitmentmhada2021@gmail.com हा ई-मेल आयडी मार्गदर्शनासाठी उपलब्ध राहील.

१३) ऑफ़लाईन परीक्षा मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती या ठिकाणी घेण्यात येणार आहे. तथापी आवश्यकतेनुसार परीक्षा स्थळामध्ये वाढ /बदल करण्याचे अधिकार म्हाडा प्रशासनाकडे राहतील. परीक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील.

१४) परीक्षेचे प्रवेश पत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वत: डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने पाठविले जाणार नाही.

१५) पात्र उमेदवारांचा अंतिम निकाल वरील संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

**७. परीक्षेचे केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सूचना**

१) परीक्षा केंद्राचा पत्ता परीक्षेच्या प्रवेशपत्रात नमूद केला जाईल.

२) परीक्षेचे केंद्र /स्थळ / दिनांक/वेळ यातील बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

३) कोणतेही परीक्षा केंद्र रद्द करणे आणि / किंवा परीक्षा केंद्र वाढविणे यांचे अधिकार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण राखून ठेवत आहे.

४) उमेदवाराने मागितलेल्या परीक्षा केंद्राव्यतिरिक्त इतर परीक्षा केंद्र देण्याचे अधिकार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण राखून ठेवीत आहे.

५) उमेदवार परीक्षा स्थळावर त्याच्या /तिच्या स्वत:च्या खर्चाने परीक्षेसाठी उपस्थित राहून परीक्षा देईल आणि यासाठी उमेदवारांस कोणत्याही प्रकारची दुखापत किंवा नुकसान झाल्यास महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

**सर्वसाधारण अटी :**

१) शासन निर्णय सा.प्र.वि. क्रमांक प्रशासन २०००/प्र.क्र.५/२००१/३२, दि. २०.०७.२००२ व दि. १९.०३.२००३ शासन निर्णयानुसार उपरोक्त पदांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणे /वापराबाबतचे खालील नमूद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनाकांपासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

ब) महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

२) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) निवड झालेल्या उमेदवाराने जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शासकीय सेवा करण्याकरीता शारीरीक क्षमतेचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) महाराष्ट्र शासनाने माध्यमिक शालांत परीक्षेशी समकक्ष ठरवलेली परीक्षा उत्तीर्ण असणा-या उमेदवारांस महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाकडून /शासनाकडून अशा परीक्षेची समकक्षता पडताळणी करुन घेतल्यानंतरच नियुक्ती दिली जाईल.

५) निवड यादीतील उमेदवाराने नियुक्तीपूर्वी मूळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, अनुभवाचा दाखला, जात प्रमाणपत्र , सन २०२०-२१ (चालू वित्तीय वर्षाचे) साठी वैध असलेला नॉन क्रिमीलेअर दाखला (आवश्यक त्या प्रवर्गासाठी). तसेच समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र त्याचप्रमाणे इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे/कागदपत्रांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या छायांकित प्रती छाननीसाठी /तपासणीसाठी नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रे /कागदपत्रे यांची छाननी नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. व तद्नंतरच

नियुक्तीस पात्र उमेदवारांना बोलाविण्यात येईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरीता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. छाननी अंती वरील प्रमाणपत्रे /कागदपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास /माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही /नियुक्ती रद्द होईल.

६) सदर नियुक्त्यांसाठी परिविक्षा कालावधी दोन वर्षाचा राहील.

७) शासन निर्णय क्र. पअंक-१००९/प्र.क्र. २००/२००९/१६अ, दि. २७.१०.२००९ नुसार अंशकालीन उमेदवार म्हणजे सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेले पदवीधर /पदविकाधारक अंशकालीन उमेदवार.

**८) शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि. ०१.११.२०१६ नुसार उमेदवार यांनी खालील क्रीडा स्पर्धामधील अर्हता प्राप्त केलेल्या असाव्यात.**

**परिशिष्ट -अ**

| गट -अ साठी पात्र क्रीडा स्पर्धा | गट -ब साठी पात्र क्रीडा स्पर्धा | गट -क साठी पात्र क्रीडा स्पर्धा |
|---|---|---|
| **१.अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा :-**<br>I) ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा<br>II) एशियन्स गेम्स<br>III)जागतिक क्रीडा स्पर्धा<br>IV) एशियन चॅम्पियनशीप<br>V)कॉमनवेल्थ गेम्स<br>VI) कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप<br>VII) युथ ऑलिम्पिक<br>VIII) ग्रॅडमास्टर (बुध्दीबळ) | **गट अ पदाकरीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू**<br>अथवा<br>१.अधिकृत आंतरराष्ट्रीय कनिष्ठ गटातील :-<br>I)ज्युनिअर वर्ल्ड चॅम्पियनशीप<br>II)युथ कॉमनवेल्थ गेम्स<br>III)कनिष्ठ गटातील एशियन चॅम्पियनशीप<br>IV)कनिष्ठ गटातील कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप<br>V)आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा (बुध्दीबळ) | **गट - अ व गट-ब या पदाकरीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू** |
| **२. पॅरॉलिम्पिक आंतरराष्ट्रीय स्पर्धा**<br>I) पॅरॉलिम्पिक गेम्स<br>II) पॅरा एशियन गेम्स<br>III) वर्ल्ड पॅरॉलिम्पिक गेम्स | **२) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट**<br>I) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा<br>II)अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट) | **१. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कनिष्ठ गट**<br>राष्ट्रीय ज्युनिअर गट अजिंक्यपद स्पर्धा |
| **३. जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा**<br>I) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा बोर्डाने आयोजित केलेले खेळ | **३.पॅरा ऑलिम्पिक स्पर्धा**<br>I) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय अजिंक्य पद स्पर्धा | **२. राज्य स्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा**<br>I)राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा |
| **४.आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारे आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा :-**<br>आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाव्दारे आयोजित केलेले खेळ | **४. राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा** | **३. राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा** |
| **५)ग्रॅन्डमास्टर किताब** | **५)राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा** | **४) राज्यस्तर ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा** |
| टीप :उपरोक्त नमूद अ.क्र. १,३ व ४ या क्रीडा स्पर्धाना ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धाचा समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कबडडी व खो खो हे देशी खेळच ५% आरक्षणासाठी पात्र राहतील. | **६) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा**<br>**आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा**<br>टिप : अ.क्र. १,२,४,५ व ६ या स्पर्धामधील ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खोखो हे देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील. | **५) राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध)**<br>**६) राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा**<br>**७ )राज्यस्तर पॅराऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा**<br>**८) राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा**<br>टिप : अ.क्र. १ ते ५ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो खो हे देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी असतील. |

खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच वरील नमूद शासन निर्णयातील तरतूदीनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे त्यामुळे खेळाडू उमेदवाराने अर्जासोबतच विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

९) शासन निर्णय क्र. संकीर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ, दि. ०४.०९.२०१५ अन्वये प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवारांना, जर त्यांना कनिष्ठ लिपिक-टंकलेखक या पदावर नियुक्ती मिळाली, तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनाकांपासून २ वर्ष इतक्या कालावधीची मुदत देण्यात येईल.

**माजी सैनिकांना कनिष्ठ लिपिक-पदावर नियुक्ती मिळाली, तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनाकांपासून ११ महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येईल.**

- **शासन निर्णय महिला व बालकल्याण क्र. ८२/२००१/म.से.आ.-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दि. २५.०५.२००१ मधील तरतूदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहील. अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता इतर सर्व मागासप्रवर्ग तसेच खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या महिला उमेदवारांनी वर्ष २०२०-२१ या कालावधीकरीता वैध असलेले (अर्थात ३१.०३.२०२१ पर्यंत वैध असलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Non-creamy layer Certificate) तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.**

- **शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. संकीर्ण -२०१७/प्र.क्र. १९१/१७/कार्या-२, दि. १५.१२.२०१७ नुसार नमूद सुधारणा नुसार जाहिरातीमध्ये अर्ज करावयाच्या अंतिम दिनांकापासून उमेदवाराचे मागील तीन आर्थिक वर्षाचे सरासरी उत्पन्न नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्रासाठी ग्राहय धरले जाईल. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Non-creamy layer Certificate) तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.**
- **दिव्यांग व्यक्तींचे आरक्षण :-**
- दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६अ, दि. २९ मे २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३३/गृनिभू, दि. २२.०२.२०२१ अन्वये पुढील तक्त्यातील प्रत्येक संवर्गासमोर नमूद केलेले दिव्यांग प्रवर्गातील व्यक्ती /उमेदवार सदर पदाकरीता आरक्षणांतर्गत पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत.

| **अ.क्र.** | **विषय** | **अर्ज करण्यास पात्र दिव्यांग प्रवर्ग** |
|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | D, HH |
| २ | उपअभियंता (स्थापत्य) | D, HH |
| ३ | मिळकत व्यवस्थापक /प्रशासकीय अधिकारी | - |
| ४ | सहायक अभियंता (स्थापत्य) | D, HH |
| ५ | सहायक विधी सल्लागार | - |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | a) D, HH<br>b) OA, OL, LC, DW, AAV<br>c) SLD,MI<br>d) MD Invovling (a) to (c) above |
| ७ | कनिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ सहायक | a) D, HH<br>b) OA, OL,OAL,CP,LC, DW,AAV<br>c) SLD,MI<br>d) MD Invovling (a) to (c) above |
| ८ | स्थापत्य अभियांत्रिकी सहायक | a) D, HH<br>b) OA, OL, LC, DW, AAV<br>c) SLD,MI<br>d) MD Invovling (a) to (c) above |

| | | |
|---|---|---|
| ९ | सहायक | a) B, LV<br>b) D,HH<br>c) OA, BA,OL, BL,OAL,CP, LC, Dw, AAV, MDy<br>d) ASD, SLD, MI<br>e) MD Invovling (a) to (d) above |
| १० | वरिष्ठ लिपिक | a) B, LV<br>b) D,HH<br>c) OA, BA,OL, BL,OAL,CP, LC, Dw, AAV, MDy<br>d) ASD, SLD, MI<br>e) MD Invovling (a) to (d) above |
| ११ | कनिष्ठ लिपिक-टंकलेखक | a)B, LV<br>b)D,HH<br>c)OA, BA,OL, BL,OAL,CP, LC, Dw, AAV, MDy<br>d)ASD (M), SLD, MI<br>e)MD Invovling (a) to (d) above |
| १२ | लघुटंकलेखक | a) B, LV<br>b) HH<br>c)OA, ,OL, BL,OAL BLOA,CP, LC, Dw, AAV<br>d)ASD (M), SLD, MI<br>e)MD Invovling (a) to (d) above |
| १३ | भूमापक | a) D, HH<br>b) OA, OL,LC,Dw, AAV<br>c) SLD, MI<br>d) MD involving (a) to (c) |
| १४ | अनुरेखक | a) D, HH<br>b) OA,OL,BL,OAL,CP,LC,Dw, AAV<br>c) ASD (M), SLD ,MI<br>d) MD involving (a) to (c) |

- **दिव्यांग असणा-या व्यक्तींकरीता (Person with disability) आरक्षित असलेल्या पदांवरील नियुक्तीसाठी संबधित प्रवर्गाचे किमान ४०% अपंगत्वाचे संबंधित जिल्हाच्या शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकिय तज्ञाने दिलेले प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. निवड झालेल्या नि:समर्थ असणा-या उमेदवारांस (Person with disability)संबंधित वैद्यकिय मंडळाने त्या पदाचे कर्तव्य बजावण्यास शारिरीकदृष्टया पात्र ठरविल्यानंतरच प्रत्यक्ष नेमणूकी देण्यात येतील.**
- माजी सैनिक /प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/अंशकालीन कर्मचारी या समांतर आरक्षण प्रवर्गातील उमेदवारांसाठी गट क व गट ड पदांमधील समांतर आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय आहे. गट अ व गट ब मधील पदांना वरील समांतर आरक्षण लागू नाही.
- अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. भुकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त उमेदवारांकडे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. छाननीच्या वेळी उमेदवाराने सदर नोंदणीपत्र, प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
- महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधि. क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेअर) तथा वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), आणि भ.ज. (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील

उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे वर्ष २०२०-२१ करीता वैध असलेले (दि.३१.०३.२०२१ पर्यंत वैध) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

- **खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ई.डब्ल्यू.एस. )-** खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (ई.डब्ल्यू.एस. ) वर्गातील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.राआधी-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२.०२.२०१९ अन्वये विहित करण्यात आलेले कागदपत्रे/पुरावा (परिशिष्ट-क) आणि स्वयंघोषणापत्र (परिशिष्ट-ड) पडताळणीच्यावेळी आवश्यक राहील. तसेच आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या /उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.८ लाखाच्या आत असले पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दि.१३.१०.१९६७ रोजी किंवा त्यापुर्वीचे रहिवासी असणे आवश्यक राहील.

  सदर प्रवर्गातील उमेदवारांकरीता वय, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय सवलती ह्या इतर मागास प्रवर्गास राज्य शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या नियमानुसार राहतील.

**विहित वयोमर्यादेतील शासकीय /निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचा अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावा. कार्यालय प्रमुखांच्या परवानगीची प्रत उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करणे आवश्यक राहील.**

**म्हाडाच्या सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचा अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावा. कार्यालय प्रमुखाच्या परवानगीची प्रत कर्मचा-यांकडे असणे आवश्यक आहे व ती कागदपत्रे छाननीवेळी सादर करणे आवश्यक राहील.**

- सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, २८ मार्च २००५ व शासन परीपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र. १७/२०००/१२, ०१ जुलै २००५ व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये विहित केल्यानुसार शासनाने गट अ, ब, क ,ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना "अ" आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन बंधनकारक आहे. सदर प्रतिज्ञापन कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. प्रतिज्ञापनाचा नमुना परिशिष्ट "अ" प्रमाणे आहे.
- अनुभवाच्या बाबतीत मासिक नियतकालीन, अंशकालीन, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही.
- ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविली असल्याचे आढळल्यास, एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
- ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर होईल अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश देण्यात येतील. सदर आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित उमेदवाराने जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे संबंधित कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.
  मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र संबंधित कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
- सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.
- अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहीत केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह ) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफ़ारशीकरीता विचार

होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ प्रवर्गासंबधातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

- अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना म्हाडाच्या अधिपत्याखालील मुंबई /कोकण/पुणे/औरंगाबाद/नागपूर /नाशिक/अमरावती या ठिकाणी मुख्यालये असलेल्या विभागीय मंडळात /कार्यालयात नियुक्ती देण्यात येईल.
- अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेली सर्व कागदपत्रे योग्य असल्याची व शासन निर्णयाच्या अटींची पूर्तता होत असल्याची खात्री झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.
- निवड सूचीमधून उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस झाल्यानंतर शिफारस झालेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवड सूचीतील प्रतिक्षा यादीवरील अतिरिक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवारांची निवड करण्यात येईल.
- वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड) या प्रवर्गाकरीता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय राहील.
- तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा नवीन भरती प्रक्रियेसाठी जाहिरात देण्यात येईल त्या दिनाकांपर्यत या दोन्हीपैकी जे आधीचे घडेल त्या दिनांकापर्यंत विधिग्राहय असेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. तथापि सदर विधीग्राहय कालावधी मध्ये बदल करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राहतील.
- निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्राधिकरणाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
- काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.
- मध्यस्थ /ठग/म्हाडाशी संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या सूचना उमेदवारांस देण्यात येत आहेत.
- कोणत्याही कारणास्तव सदर जाहिरातीत दर्शविण्यात आलेली पदे अथवा सदरहू जाहिरात रद्द करण्याचा अधिकार म्हाडा प्रशासन राखून ठेवत आहे. सदर भरतीच्या नियम /निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन निर्णय /परिपत्रक /म्हाडा प्रशासनाच्या निर्णयानुसार बदल होऊ शकतो. कोणताही किंवा सर्व अर्ज त्यासाठी काहीही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार म्हाडा प्रशासन राखून ठेवीत आहे.

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन)**

**नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना "अ"**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना अ**

मी, श्री /श्रीमती/कुमारी ........................................................................................................ श्री ................................................................................................. यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी वय .................. वर्ष ...................... राहणार ............................................................... याव्दारे पुढीलप्रमाणे जाहिर करतो /करते की, मी .........................................................................या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

आज रोजी मला .......................(संख्या) इतकी हयात मुले / मुली आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च २००५ यानंतर मला झालेल्या मुलांची संख्या ----------------- आहे (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : (अर्जदाराची सही)

- **ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत --**

१) उपरोक्त पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा दि. १७.०९.२०२१ ते १४.१०.२०२१ पर्यंत www.mhada.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

२) विहित पध्दतीने माहिती सादर करुन शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने रक्कम भरण्याची कार्यवाही दि.१५.१०.२०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

३) उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परीक्षेचा अंतिम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा /अपुर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याव्दारे पाठविलेल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण जबाबदार राहणार नाही. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल/एस.एम.एस.व्दारे कळविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या ई-मेल आयडीची कोणत्याही परिस्थितीत इतर व्यक्तीसोबत देवाण-घेवाण करु नये. एखादया उमेदवाराचा वैध ई-मेल आयडी नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा ईमेल आयडी तयार करणे आवश्यक आहे.

४) ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पध्दतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागतील. परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर मिळणा-या ई पावतीची (Transaction Successful झाल्यानंतर) प्रत त्वरीत मुद्रण करुन (Printout) स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.

५) ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरीता "Click for Registration" हा टॅब निवडून त्यामध्ये नाव, संपर्काची माहिती, भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी नमूद करावा. तद्नंतर "Submit" बटन दाबावे. त्यानंतर उमेदवाराच्या भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी वर OTP येईल. सदर OTP टाकल्यानंतर Log-in Id व Password भ्रमणध्वनी व email id द्वारे प्राप्त होईल. तद्नंतर सदर Log-in Id व Password वापरून उमेदवाराला अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरू करता येईल.

६) उमेदवाराने स्वत:चे /वडीलांचे /पतीचे नांव तसेच नावाचे स्पेलिंग योग्यरित्या भरणे आवश्यक आहे.

७) ऑनलाईन अर्ज भरून झाल्यानंतर " Save & Preview" टॅबवर क्लिक करुन संपूर्ण अर्ज तपासून पहावा. जर अर्जामध्ये काही सुधारणा करावयाची असेल तर Edit या बटनाचा वापर करून माहितीमध्ये आवश्यक सुधारणा करावी.

८) आवश्यकतेनुसार ऑनलाईन अर्जातील माहितीमध्ये सुधारणा करुन, तसेच छायाचित्र व स्वाक्षरी योग्य रितीने अपलोड झाल्याची व इतर माहिती अचूक असल्याची खात्री करुन "Payment/make payment" बटनवर क्लिक करून परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे.

९) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना योग्य ती काळजी घ्यावी. उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक रितीने भरावी. तसेच विहित आकारातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर, छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पध्दतीने भरल्यानंतर अर्ज स्वीकृत होईल. एकदा शुल्क भरणा केल्यानंतर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने आवश्यक ती माहिती योग्य पध्दतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१०) ज्या उमेदवारांना एकापेक्षा जास्त संवर्गात अर्ज करावयाचे असतील अशा उमेदवारांनी एका संवर्गात अर्ज पुर्णपणे भरून शुल्क भरणा प्रक्रीया पुर्ण केल्यावर पुन्हा नव्याने रजिस्ट्रेशन करावयाचे आहे. नव्याने रजिस्ट्रेशन करताना पुर्वी वापरलेला email id व भ्रमणध्वनी क्रमांक वापरावयाचा आहे. प्रत्येक संवर्गाकरीता स्वतंत्र login id व password तयार होईल. उमेदवारांनी सदर login id व password जतन करणे आवश्यक आहे.

११) ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने विहित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. तद्नंतर केलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१२) उमेदवाराने विहित मुदतीत ऑनलाईन अर्जासोबत परीक्षा शुल्क भरण्याची कार्यवाही करावी. जेणेकरुन शेवटच्या क्षणी अडचण येणार नाही.

१३) उमेदवाराने अर्जात स्वत:चे नांव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी व परीक्षेचे केंद्र इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण जबाबदार राहणार नाही.

१४) अपूर्ण अर्ज उदा. छायाचित्र आणि स्वाक्षरी इत्यादी नसलेले अवैध ठरविण्यात येईल.

१५) वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे याशिवाय दुस-या पध्दतीने केलेले अर्ज अवैध ठरविण्यात येतील.

१६) उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर /उपस्थितीपत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी.

१७) उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरील प्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

१८) रजिस्ट्रेशन व परीक्षा शुल्क पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने संपूर्ण अर्जाची प्रत Download करून त्याची मुद्रण प्रत (Printout) स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीस उमेदवार स्वत: जबाबदार राहील त्यास महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

- **ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची पध्दत -**

१) ऑनलाइन अर्ज हा परीक्षा शुल्क भरण्याच्या सुविधेसह (Payment Gateway) एकत्रित करुन उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

२) परीक्षा शुल्क इंटरनेट बँकींग किंवा क्रेडीट कार्ड किंवा डेबीट कार्ड किंवा युपीआय इ. व्दारे भरता येईल.

३) ऑनलाईन परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर थोडा वेळ वाट पहाणे आवश्यक आहे. सदर कालावधीत कोणत्याही परिस्थितीत refresh / back किंवा अन्य बटन/key दाबू नये.

४) ऑनलाईन शुल्क भरणा यशस्वी झाल्यानंतर ई-पावती (E-Receipt) तयार होईल. ई-पावती तयार न होणे हे परीक्षा शुल्क भरले गेले नाही असे दर्शविते.

५) उमेदवाराचे ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे यशस्वी न झाल्यास अशावेळी उमेदवाराने ऑनलाईन लिंकवर जाऊन पुन:श्च लॉग इन करणे आवश्यक आहे.

६) नोंदणी यशस्वी झाल्यानंतर उमेदवारास ई-पावती मिळेल. सदर ई-पावती व ऑनलाईन अर्जाची प्रत Download करून त्याची मुद्रण प्रत (Printout) ठेवणे आवश्यक आहे.

७) आपले रजिस्ट्रेशन पूर्ण झाल्यानंतर ब्राऊजर विंडो बंद करण्याची दक्षता घ्यावी.

८) उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

- छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग करण्याच्या सूचना.

छायाचित्र :-

१) उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र अपलोड करावे.

२) सदरचे छायाचित्र फिकट, रंगीत किंवा पांढ-या रंगाचा पृष्ठभाग असलेले असावे.

३) कॅमेराकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे. सुर्यप्रकाशात जर छायाचित्र काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी. फ्लॅशचा वापर केल्यास Red Eye येणार नाही याची दक्षता घ्यावी.

४) चष्मा वापरत असल्यास तुमचे डोळे दिसतील अशा प्रकारचे छायाचित्र असावे. छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गॉगल घालू नये. जेणेकरुन चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

**५)** स्कॅन केलेले छायाचित्र हे १००kb पेक्षा मोठे नसेल याची दक्षता घ्यावी.

**स्वाक्षरी :-**

१) उमेदवाराने काळया शाईच्या पेनाने पांढ-या कागदावर स्वाक्षरी करावी.

२) सदरची स्वाक्षरी ही उमेदवाराचीच असावी. सदरची स्वाक्षरी ही प्रवेशपत्रावर ज्या ठिकाणी अपलोड करणे आवश्यक आहे तेथे अपलोड करण्यात यावी.

३) अर्जासोबत अपलोड केलेले स्वाक्षरी व उपस्थिती पत्रावरील स्वाक्षरी भिन्न असेल तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

४) स्वाक्षरीची स्कॅन केलेली ईमेज ही ५०kb पेक्षा जास्त नसेल याची दक्षता घ्यावी.

- **छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची पध्दत .**

१) छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी अर्जामध्ये दोन स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. उमेदवाराने योग्य त्या लिंकवर क्लिक करावे व त्यानंतर छायाचित्र /स्वाक्षरी असेलेली फाईल Select करावी व Upload बटनावर क्लिक करावे.

२) उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी ही उपरोक्त पध्दत अवलंबिल्याशिवाय Upload होणार नाही याची नोंद घ्यावी.

३) उमेदवाराचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

- **प्रवेशपत्र डाऊनलोड करणे**

  प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई-मेल/एस.एम.एस. व्दारे कळविण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेसाठी प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता उमेदवारांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर भेट द्यावी. संकेतस्थळावरील भरतीविषयक संबधित Link वर Click केल्यानंतर अर्जदारास Login करावे लागेल. Login केल्यावर अर्जदारास "HallTicket" बटनावर Click करून प्रवेशपत्र डाऊनलोड करावे. उमेदवाराने प्रवेशपत्रावर रजिस्ट्रेशन करताना वापरलेले अलिकडच्या काळातील छायाचित्र चिकटवावे.

- **ओळख पटवणे**

  १) परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले वैध फोटा ओळखपत्र जसे पॅन कार्ड / पारपत्र / वाहनचालक परवाना / मतदार ओळखपत्र / फोटोसहित आधारकार्ड / बॅंकेचे फोटोसहीतचे पासबुक / महाविद्यालयाचे / विद्यापीठाचे अलिकडील वैध ओळखपत्र/कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहित असणारे बार कौन्सिलेचे ओळखपत्र समवेक्षक/पर्यवेक्षकला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक/उपस्थितीपत्रक त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

  **टिप** : उपरोक्त परीक्षेला उपस्थित रहातांना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची उपरोक्त नमूदपैकी आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती, परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नांव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणा-या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या /मधल्या /शेवटच्या नावांत विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाणपत्र /प्रतिज्ञापत्र (Affidavit) यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. **रेशनकार्ड व ई -आधार कार्ड परीक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही**.

  सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित रहाणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

  १) परीक्षेसाठी वैध प्रवेशपत्र

  २) मुळ फोटो ओळखपत्र

  ३) फोटो ओळखपत्राची छायाप्रत.